**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येणा-या रोपवाटीका व वृक्ष लागवड कार्यक्रमासाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्याकरिता मनुष्यबळ बाह्यस्थ पध्दतीने घेण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
शासन निर्णय, मग्रारोहयो-२०११/प्र.क्र. १३४ /रोहयो-१०अ
दिनांक : ३१ डिसेंबर, २०११

**वाचा :** १. शासन निर्णय क्र. मग्रारो-२०११/प्र.क्र.२८/रोहयो-१, दिनांक ९ मे,२०११
२. शासन निर्णय क्र. मग्रारो-२०११/प्र.क्र.२८/रोहयो-१, दिनांक १० मे,२०११
३. शासन परिपत्रक क्रमांक मग्रारो-२०११/प्र.क्र.२८/रोहयो-१ दि.२ सप्टेंबर,२०११

## प्रस्तावना :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम, २००५ मधील शेडयुल - १ मध्ये अनुज्ञेय कामात वनीकरण व झाडे लावणे (Afforestation and tree planting) यांना प्राथमिकता दिलेली आहे. तद्नुसार ग्रामपंचायतीमार्फत रोपवाटीका, वृक्ष लागवड व विखुरलेल्या स्वरुपात उंच रोपांची लागवड करण्यासंदर्भात उपरोक्त शासन निर्णय दिनांक ९ मे, २०११ व १० मे, २०११ अन्वये तांत्रिक व आर्थिक मापदंड निश्चित करुन मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. उपरोक्त वृक्ष लागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याकरीता मोठया प्रमाणावर रोपवाटीका निर्मिती करुन रोपांची निर्मिती, वाढ, संगोपन, तसेच जतन करणे इत्यादी कामे करावयाची आहेत. सदर कामे तांत्रिक स्वरुपाची असून यामध्ये वेळोवेळी प्रत्येक टप्प्यावर सर्व संबंधितांना प्रशिक्षण देणे, मार्गदर्शन करणे व यात कौशल्य निर्माण करणे आवश्यक आहे. तथापि वृक्ष लागवडीकरीता बियांची पेरणी केली असता त्याला अंकुर फुटण्यामध्ये अडचण निर्माण होऊ शकते. तसेच विशेषत: रोपवाटीका निर्मिती व वृक्ष लागवडीसंदर्भात ग्रामपंचायत स्तरावर याबाबत विशेष ज्ञानाचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे.

३. उपरोक्त बाबी विचारात घेऊन ग्रामपंचायती स्तरावर रोपवाटीकेतील रोपांच्या जगण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी तांत्रिक मनुष्यबळ बाह्यस्थ पध्दतीने घेण्याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

## शासन निर्णय :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत रोपवाटीका निर्मिती व वृक्ष लागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याकरीता मोठया प्रमाणावर रोपवाटीका निर्मिती करुन रोपांची निर्मिती, वाढ, संगोपन, तसेच जतन करणे इत्यादी कामे करण्याकरीता तसेच उपरोक्त कार्यक्रमाचे तांत्रिक स्वरुप लक्षात घेऊन संबंधितांना वेळोवेळी प्रत्येक टप्प्यावर सर्व संबंधितांना प्रशिक्षण देणे, मार्गदर्शन करणे व यात कौशल्य निर्माण करणे आवश्यक आहे. त्याकरीता ग्रामपंचायत स्तरावर तांत्रिक मनुष्यबळ बाह्यस्थ पध्दतीने घेण्यास शासन मान्यता देत आहे.

सदर वृक्ष मार्गदर्शक व संरक्षक याची नेमणूक करण्याकरीता तालुका स्तरावर खालील समिती नियुक्त करण्यात यावी:-

| | |
|---|---|
| १) गटविकास अधिकारी | - अध्यक्ष |
| २) वनपरिक्षेत्र अधिकारी/ लागवड अधिकारी | - सदस्य |
| ३) तालूका कृषि अधिकारी (कृषि विभाग) | - सदस्य |
| ४) कृषि अधिकारी (पंचायत) | - सदस्य सचिव |

सर्वसाधारण: १ ते १५ ग्रामपंचायतीकरीता १ वृक्ष मार्गदर्शक व संरक्षक असावा, तथापि स्थानिक परिस्थितीनुसार यात बदल करण्याचे अधिकार वरील समितीला असतील.

**२.** सदर समितीने उपरोक्त सुयोग्य उमेदवाराची निवड करण्याकरिता वृत्तपत्रात जाहीरात अथवा इतर मार्गाने प्रसिध्दी देऊन अर्ज मागवावेत व उमेदवारांची तात्काळ तोंडी मुलाखत घेवून सुयोग उमेदवारांचे नियुक्ती करावी.

**सर्व साधारणपणे खालील प्रवर्गातून उमेदवाराची निवड करावी.**

अ) सेवानिवृत्त सहाय्यक वनसंरक्षक/ वनपरिक्षेत्र अधिकारी / वनपाल

ब) सेवानिवृत्त कृषि अधिकारी/कृषि पर्यवेक्षक/ कृषि विषयात तज्ञ शिक्षक.

क) वनस्पती शास्त्राची उत्तम माहिती असलेली शिक्षक

ड) वृक्ष लागवड या विषयात काम करणाऱ्या नामांकित अशासकीय संस्थेमार्फत तज्ञ.

**<u>वृक्ष मार्गदर्शक व संरक्षक यांची कर्तव्ये :-</u>**

**वृक्ष मार्गदर्शक व संरक्षक यांची कर्तव्ये खालीलप्रमाणे राहतील :-**

अ) नेमून दिलेल्या ग्रामपंचायत क्षेत्राअंतर्गत रोपवाटिका /वृक्ष लागवडीचे कामांना भेटी देणे.

ब) ग्रामपंचायत स्तरावरील संबंधित कर्मचा-यास रोपनिर्मीतीपासून ते वृक्ष लागवडीकरिता खड्डे खणणे, रोपाचे प्रजातीची निवड , रोपे लावणे, रोपाचे संगोपन करुन जिवंत झाडाची टक्केवारी १०० टक्के ठेवण्याच्या दृष्टिने मार्गदर्शन करणे. या करिता त्यांना वन विभाग व सामाजिक वनिकारण विभागाच्या आधिकाऱ्यांकडून वेळोवेळी प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्यात यावे.

क) कामाची गुणवत्ता चांगली राहील व कोणत्या तांत्रिक उणीवा राहणार नाही याची दक्षता घेणे.

**४. <u>वृक्ष मार्गदर्शक व संरक्षक यांना अनुज्ञेय मानधन -</u>**

वृक्ष मार्गदर्शक व संरक्षक म्हणून निवड झालेल्या कर्मचा-याने सर्वसाधारणत: एका आठवडयात एक याप्रमाणे सात महिन्यात २८ ठिकाणी भेटी द्याव्यात. या भेटीचा अहवाल सरपंच/ग्रामसेवकाच्या स्वाक्षरीने संबंधित ग्रामपंचायतीस सादर करावा. वृक्ष मार्गदर्शक व संरक्षक यांनी सदर केलेल्या अहवालात काही गंभीर बाबी /मुद्दे निदर्शनास आणून दिल्यास त्याबाबत गटविकास अधिकाऱ्याने वन विभाग व सामाजिक वनिकारण विभागाच्या आधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घ्यावे. भेटीच्या अहवालाचा विहित नमुना समितीने तयार करावा. प्रत्येक भेटीकरिता रुपये २५०/- इतके मानधन अनुज्ञेय राहील. भेट दिल्यानंतर १५ दिवसात गटविकास अधिकाऱ्याने वृक्ष मार्गदर्शक व संरक्षक यांना मानधन प्रदान करावे. मात्र प्रवासाकरीता कोणताही प्रवास खर्च देण्यात येणार नाही. मानधनाचा खर्च हा म.गां.रा.ग्रा. रोहयोच्या ६ टक्के प्रशासकीय खर्चाकरिता उपलब्ध निधीमधून भागविण्यात यावा.

**५.    <u>वृक्ष मार्गदर्शक व संरक्षक यांच्या भेटीचा अहवाल -</u>**

वृक्ष मार्गदर्शक व संरक्षक यांनी भेटीचा अहवाल रोपवाटीका स्वयंमुल्यांकन प्रपत्र व रोपवाटीका मुल्यांकन प्रपत्रात ग्रामपंचायतीस सादर करावा. (रोपवाटीका स्वयंमुल्यांकन प्रपत्र व रोपवाटीका मुल्यांकन प्रपत्राचा विहीत नमुना सोबत जोडला आहे. तथापि, आवश्यक असल्यास विहीत नमुन्यात सुधारणा / बदल करण्याची मुभा राहील.)

**६.    <u>वृक्ष मार्गदर्शक व संरक्षक यांच्या नेमणुकीचा कालावधी :-</u>**

वृक्ष मार्गदर्शक व संरक्षक यांच्या नेमणुकीचा कालावधी दिनांक १ जानेवारी २०११ ते ३१ जुलै, २०११ असा राहील.

**७.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१११२३१११५१५५१२५७००१ हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुधीर ठाकरे)**
**सचिव (ग्रामविकास विभाग)**

**( व्ही. गिरिराज)**
**प्रधान सचिव (रोहयो) नियोजन विभाग.**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे खाजगी सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
सर्व अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त.
आयुक्त (कृषि),महाराष्ट्र राज्य, पुणे.
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे.
प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे.
संचालक, भुजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
उप सचिव (रोहयो समिती), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी (बृहन्मुंबई वगळून)

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद.
महासंचालक, अर्थ व सांखिकी संचालनालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई. (प्रसिध्दी करीता),
विभागीय कृषि सहसंचालक,ठाणे,पुणे,कोल्हापूर,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर, लातूर.
सर्व अधीक्षक कृषि अधिकारी,
सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते, नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक/पुणे/ कोंकण वृत्त ठाणे.
सर्व मुख्य वन संरक्षक/सर्व उप वनसंरक्षक.
सर्व विभागीय वन संरक्षक/सर्व विभागीय मृदसंधारण अधिकारी.
सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व कार्यासन अधिकारी, रोहयो प्रभाग व जलसंधरण विभाग.
निवडनस्ती / सारग्रंथ रोहयो-१

**<u>रोपवाटीका स्वयंमुल्यांकन प्रपत्र</u>**

**(रोपवाटीकेचे प्रत्यक्ष नियंत्रण करणाऱ्या कर्मचाऱ्याने भरावे)**

| | | |
|---|---|---|
| १. रोपवाटीका नांव / गांव / तालुका जिल्हा | : | |
| २. रोपवाटीका सुरु करण्याचा दिनांक | : | |
| ३. एकूण उद्दिष्ट व एकूण भरलेल्या पिशव्याची संख्या | | आहे / नाही |
| ४. पॉलिथीन पिशव्या आकार १२.५x २५ से.मी. | : | आहे / नाही |
| ५. पॉलिथीन पिशव्यांना पाण्याच्या निचऱ्यासाठी छिद्रे आहेत | : | आहे / नाही |
| ६. पिशव्या भरतांना माती, रेती, खत मिश्रण २:१:१ प्रमाणात घेतले | : | आहे / नाही |
| ७. रोपांना पाणी देण्याची व्यवस्था | : | आहे / नाही |
| ८. सर्व पिशव्यात रोपे आहेत. | : | आहे / नाही |
| ९. पिशव्यामध्ये तण आहे | : | आहे / नाही |
| १०. रोपांवर रोग / किड | : | आहे / नाही |
| ११. रोपवाटीका संरक्षणाची व्यवस्था | : | आहे / नाही |
| १२. रोपांची वाढ समाधानकारक आहे | : | आहे / नाही |

ग्रामसेवक / ग्रामसचिव यांची
स्वाक्षरी

<u>१. रोपवाटीका मूल्यांकन प्रपत्र</u>

अ. रोपवाटीकेचे नाव / गाव/तालुका / जिल्हा :-

ब. एकुण रोपे
(एकूण वाफे व प्रती वाफा रोपे यावरुन अंदाज करावा) :-

१. बि पेरणी दिनांक :-

२. रोपे जाती :-

३. पिशवी आकार १२.५x२५ :- आहे / नाही

४. पिशव्यांचा रंग काळा आहे किंवा नाही

५. मिश्रणांत पोयटयाची माती कंपोस्ट व शेती २:१:१ प्रमाणे आहे / नाही

६. पिशव्यांना पाणी निघण्यासाठी छिद्रे आहेत / नाहीत :-
पिशव्यांचा १ से.मी. भाग बाहेरच्या कडेने दुमडला आहे/ नाही

७. रोपे वाफयात योग्य प्रकारे लावली आहे/ नाही

८. रोपांना झारीने पाणी दिले जाते / नाही

९. रोपांची सरासरी उंची सेंमी :- १० सें.मी. पर्यंत,१०-१५ सें.मी. पर्यंत
(खुण करावी -/ ) १५.३० सें.मी., ३० सें.मी. चे वर

१०. पिशव्यामध्ये ताण आहे/ नाही :-

११. रोपावर काही रोग (किड) आहे / नाही :-

१२. सिंचन व्यवस्था कशी आहे :-(विहीर / तलाव / हातपंप इ.)

१३. रोपवाटीका संरक्षणासाठी कुंपण आहे / नाही :-

१४. रोपांची सर्व साधारण स्थिती :-
(उत्कृष्ट / समाधान कारक / असमाधानकारक)

१५. रोपवाटीका नोंदवही ठेवली आहे / नाही :-

दिनांक

तपासणीसाचे नांव / पद
स्वाक्षरी